2] निकड

अ] गरज ब] जवळ

क] अनावश्यक ड] निवड

3] क्रोध

अ] जाळ ब]राग

क] द्वेष ड] चीड

4] सोहळा

अ] कार्यक्रम ब] सण

क] सभा ड] उत्सव

**आ)** योग्य पर्याय निवडून पुढील समास ओळखा. (कोणतेही 2) (2x2=4)

1] शब्दकोश

अ] विभक्ती तत्पुरुष ब] कर्मधारय

क] द्वंद्व समास ड] द्विगू समास

2] पुढीलपैकी कोणते पद द्विगू समास आहे ?

अ] परमेश्वर ब] पंचधातू

क] सुखदुःख ड] दहावीस

3] पुढीलपैकी कोणते पद अव्ययीभाव समास आहे ?

अ] महात्मा ब] दरवर्षी

क] ताणताणाव ड] गप्पागोष्टी

4] गुणदोष

अ] कर्मधारय समास ब] द्वंद्व समास

क] विभक्ती तत्पुरुष ड] द्विगू समास

**इ)** पुढील वाक्यांचा प्रयोग ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्याचा प्रयोग बदला.
(कोणतेही 3) (3x2 =6)

1] चिनी सैनिकांनी गोळीबार केला. (प्रयोग ओळखा)

2] देवकीने गाणे खूप सुंदर गायिले. (कर्तरी करा.)

3] कप्तानाने सैनिकांना सूचना दिल्या. (प्रयोग ओळखा)

4] ती हलकेच खिडकी उघडते. (कर्मणी करा.)

**ई)** वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्यप्रकार बदला. (कोणतेही 3) (3 x 2 = 6)

1)'किती मनापासून हसतात ती लहान मुलं !' – या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे .....

अ] ती लहान मुलं खूप मनापासून हसतात.

ब] ती लहान मुलं मनापासून हसतात का ?

क] त्या लहान मुलांनी खूप मनापासून हसावे.

ड] लहान मुलांनो मनापासून हसा.

2) 'या वर्षीच्या पावसाने खूप नुकसान झाले.' – या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्य असेल ......

अ] या वर्षीच्या पावसाने काय कमी नुकसान झाले का ?

ब] किती नुकसान केले या वर्षी पावसाने !

क] या वर्षीच्या पावसाने खूप नुकसान व्हावे.

ड] या वर्षीच्या पावसाने काहीच लाभ मिळाला नाही.

3) 'आपला परिसर स्वच्छ ठेवावा.' – हा वाक्यप्रकार आहे ....

अ] प्रश्नार्थी ब] विधानार्थी
क] विद्यर्थ ड] आज्ञार्थ

4) 'ही कल्पना चांगली आहे.' – हा वाक्यप्रकार आहे .....
अ] नकारार्थी ब] विद्यर्थ
क] प्रश्नार्थी ड] होकारार्थी

5) 'तू नियमित सराव कर.' - हा वाक्यप्रकार आहे ......
अ] उद्गारवाचक ब] विद्यर्थ
क] आज्ञार्थ ड] होकारार्थी

**उ)** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दसमूहाऐवजी कंसातील योग्य अर्थाच्या वाक्प्रचाराचा उपयोग करा. (कोणतेही तीन) (3 x 2 = 6)

[वाक्प्रचार - नजर ठेवणे, दातखिळी बसणे, आभाळाकडे डोळे लावणे. दोघात सख्य नसणे. बळ लावणे. जमीनअस्मानाचे अंतर असणे. ]

1] मृग नक्षत्र सुरु होताच शेतकरी आतुरतेने पावसाची वाट पाहतो.
2] मुलांनी आपली ताकद लावली अन् शेवटी ती खिडकी उघडली.
3] पश्चिमी संस्कृती आणि भारतीय संस्कृती यात मोठीच तफावत आहे.
4] ती अवाढव्य काळी आकृती पाहून उषाकाकूला खूप भीती वाटू लागली.
5] तात्या बँकेतून रक्कम घेऊन बाहेर पडले, परशा त्यांच्यावर लक्ष ठेऊन होताच.

. ## विभाग : ड : गद्य–पद्य पाठ आणि उपयोजित लेखन (25)

**प्रश्न 6:** गद्य-पाठांधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**अ)** योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (3)

1) 'शोध' कथेत कोणत्या नोटेचा शोध सुरु होता ?
अ] डॉलरच्या
ब] शंभर रुपयाच्या
क] हरवलेल्या दोन हजाराच्या
ड] पेशंट मुलीने दिलेल्या एक रुपयाच्या

2)'मराठी भाषेला दातांविषयी आदर नाही.' असे लेखकाचे मत आहे, कारण .....
अ] मराठीत दातांसंबंधी म्हणी नाहीत.
ब] दातात तृण धरून शरण जावे लागते.
क] मराठीत दातासंबंधी मंगल भावना व्यक्त करणारा एकही शब्दप्रयोग नाही.
ड] दात पाडून घशात घातले जातात.

3) आनंद जितका सहजपणे घ्याल तितका तो .......
अ] हातातून निसटतो. ब] हुलकावण्या देतो
क] सहजपणे मिळतो. ड] दडून बसतो.

**प्रश्न 6:ब)** पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची प्रत्येकी सुमारे 35/40 शब्दांत उत्तरे लिहा. (4)

1) 'रेशीमबंध' पाठात उत्तररात्रीच्या आगमनाची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?
2) वाहनांचा वेग वाढल्याने शरीरावर कोणते दुष्परिणाम होतात?

3) लेखक शिवराज गोर्ले यांनी खऱ्या आनंदाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?
4)] अनुचा घर सोडण्यामागचा विचार 'शोध' या कथेच्या आधारे थोडक्यात लिहा.

**प्रश्न 6:क)** पुढीलपैकी कोणत्याही <u>दोन प्रश्नांची उत्तरे</u> सुमारे 80 / 90 शब्दांत लिहा. (8)
1) सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत तसं आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो.' असे का म्हटले आहे ?
2) आरंभी माणसे वाहनांवर मग वाहने माणसांवर स्वार होतात असे का म्हटले आहे ?
3) दातदुखीमुळे लेखकाचे आध्यात्मिक तत्त्वचिंतन कसे होते ?
4) 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

**प्रश्न 7 अ) :** <u>पद्य पाठांच्या</u> आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.
**अ)** योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (2)
1) कवी बोरकरांनी वर्णिलेली '...कोमल पाचूची शेते' म्हणजे .....
अ] वेळूची बेटे ब] फुललेला चाफा
क] फुलपाखरांचे पंख ड] शेतातील पिके
2) सुरेश भट लिखित 'रंग माझा वेगळा' ही एक .....
अ] कविता आहे. ब] गज़ल आहे.
क] अभंग आहे. ड] टीवी मालिका आहे.

**प्रश्न 7. ब)** कोणत्याही <u>दोन प्रश्नांची</u> सुमारे 35/40 शब्दांत उत्तर लिहा. (4)
1) कवयित्री हिरा बनसोडे यांनी स्त्रीमध्ये जाणवलेले बदल कसे वर्णन केले आहेत?
2) 'रोज मातीत' या कवितेतील शेतकरी स्त्री कोणकोणती कामे करते ?
3) कवी बा. भ. बोरकर आषाढ घनांना थांबायला का सांगत आहे ?
4) 'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा' असे कवी का म्हणतात ?

**प्रश्न 7. क)** पुढीलपैकी <u>एका प्रश्नाचे</u> उत्तर सुमारे 70/75 शब्दांत लिहा. (4)
1)पुढील काव्यपंक्तींचा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. –

'उघड गगन, कर घडीभर आसर
आणि खुले कर वासरमणी-घर'
वाहू दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

3) पुढील काव्यपंक्तीचा संदर्भासह आशय स्पष्ट करा.

'नाही बेणं ग मन दाबते, बाई दाबते
कांड्याकांड्यानी संसार सांधते बाई सांधते

*****************